RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०३ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी २५ - ३१, २०२४ / माघ ०५ - ११, शके १९४५ [ पृष्ठे ०६

## प्राधिकृत प्रकाशन

### आयुक्त तथा प्रशासक यांजकडून

### सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

### आदेश

क्र. मनपा/अतिक्रमण निर्मूलन विभाग/२१/२०२३-२४.— ज्याअर्थी, सांगली-मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक मालमत्ता, रस्ते, फूटपाथ, विद्युत खांब व इतर सार्वजनिक, शासकीय व निमशासकीय ठिकाणी विविध पक्षांचे, सामाजिक संघटनांचे होर्डिंग्ज, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक विनापरवाना अथवा मर्यादेपेक्षा अधिक कालावधीपर्यंत लावण्यात आल्याचे आढळून येत आहे.

तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिटपिटिशन क्र. १५५/११, अन्वये दाखल जनहित याचिकेवरील आदेशाने शहर विद्रूपीकरण करणाऱ्या विनापरवाना लावण्यात आलेले होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड इत्यादी जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. त्यामुळे सदर कारवाई करणे महानगरपालिका प्रशासनास क्रमप्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, शहर विद्रूपीकरण करणाऱ्या विनापरवाना लावण्यात आलेले होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड इत्यादींवर वेळीच कारवाई होणे आवश्यक असल्याने याकामी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे प्रभाग समिती क्रमांक ०१ ते ०४ चे सहा. आयुक्त यांची 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून नियुक्ती करणे येत आहे.

### परिशिष्ट

| अ.क्र. | अधिकारी नाव | हुद्दा | सोपविण्यात आलेले कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. वैभव साबळे | उपायुक्त, (अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम प्रतिबंध व निर्मूलन). | नोडल अधिकारी संपूर्ण महानगरपालिका क्षेत्र |
| २. | श्री. सहदेव कावडे | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्रमांक ०१ | प्रभाग समिती क्रमांक ०१ चे संपूर्ण कार्यक्षेत्र तसेच मा. आयुक्त/उपायुक्त नेमून देतील त्या विविक्षित प्रकरणी. |
| ३. | श्री. सचिन सागावकर | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्रमांक ०२ | प्रभाग समिती क्रमांक ०२ चे संपूर्ण कार्यक्षेत्र तसेच मा. आयुक्त/उपायुक्त नेमून देतील त्या विविक्षित प्रकरणी. |
| ४. | श्री. मानसिंग पाटील | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०३ | प्रभाग समिती क्रमांक ०३ चे संपूर्ण कार्यक्षेत्र तसेच मा. आयुक्त/उपायुक्त नेमून देतील त्या विविक्षित प्रकरणी. |
| ५. | श्री. अनिस मुल्ला | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०४ | प्रभाग समिती क्रमांक ०४ चे संपूर्ण कार्यक्षेत्र तसेच मा. आयुक्त/उपायुक्त नेमून देतील त्या विविक्षित प्रकरणी. |

तरी, वरील नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी उपरोक्त १ ते ४ अधिकारी यांच्या नियुक्तीच्या कालावधीत त्यांना पदनिर्देशित अधिकारी समजण्यात येईल व उपरोक्त व्यक्तींची पदस्थापना ही बदली, निवृत्ती, मृत्यू इत्यादी कोणत्याही कारणामुळे संपुष्टात आल्यास संबंधित पदाचा पदभार स्वीकारणारा व्यक्ती हा तद्नंतर 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून जबाबदार असेल. यानुसार सदर आदेशामध्ये मा. आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका बदल करेपर्यंत उपरोक्त पदी भविष्यात कार्यरत अधिकारी अखंडपणे 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून देखील कार्यरत राहतील.

त्या अनुषंगाने, उपरोक्त नामनिर्देशित अधिकाऱ्यांवर अशा शहर विद्रूपीकरण करणाऱ्या विनापरवाना लावण्यात आलेले होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड इत्यादींवर रिटपिटिशन क्रमांक १५५/११, अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशातील मुद्दा क्रमांक ५९ नुसार उक्त कामी करावयाच्या कारवाईबाबत नमूद मार्गदर्शक सूचनेच्या अधीन राहून वेळीच करावयाची कार्यवाही व जबाबदारी खाली विषद केल्याप्रमाणे आहे ;

(१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४ आणि २४५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अंतर्गत जाहिरातकर नियम १९७०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट 'ड' प्रकरण ११ नुसार आयुक्तांच्या परवानगीशिवाय जाहिरात/बॅनर लावू नयेत, अशा तरतुदी असून प्रस्तुत आदेशांचे पालन होत असलेची खातरजमा करणे.

(२) पदनिर्देशित अधिकारी यांनी Defacement Act, १९९५ अन्वये उल्लंघन कर्त्यांवर गुन्हा दाखल करणे क्रमप्राप्त व बंधनकारक असल्याने आवश्यकता भासल्यास स्थानिक पोलीस ठाण्याकडून पोलीस बंदोबस्त सोबत घेऊन अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड इत्यादी लावणाऱ्या राजकीय/अराजकीय व्यक्ती, संस्था यांवर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलीस प्रशासनाकडे गुन्हे दाखल करणे.

(३) अनधिकृत बॅनर/होर्डिंग इत्यादी हटविणे तसेच जप्त करणे.

(४) अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड निनावी तक्रारदेखील दाखल करून घेऊन सदर तक्रारींचे निवारण करणे.

(५) टोल फ्री फोन नंबर + व्हॉट्स ॲप + एस.एम.एस. + संकेतस्थळ इत्यादीवरती तक्रार दाखल करणेची सुविधा देणे आवश्यक असल्याने महानगरपालिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या टोल फ्री फोन नंबर + व्हॉट्स ॲप + एस.एम.एस. + संकेतस्थळ इत्यादी सही व्यापक प्रसिद्धी देणे.

(६) अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड यांचेवर होणाऱ्या कारवाईबाबत आपणास नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये वृत्तपत्र, TV, संकेतस्थळ इत्यादी माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देणे.

(७) महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वेळोवेळी साजरा होणाऱ्या सणांपूर्वी जसे गणेशोत्सव, दिवाळी, नवरात्री इत्यादी मुख्य सणांपूर्वी पुन्हा व्यापक प्रसिद्धी देणे.

(८) सदरकामी प्रभाग स्तरावरील नागरिकांच्या समितीसोबत समन्वय साधणे व समितीच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन उपायुक्त (नोडल अधिकारी) यांचेकडे अहवाल सादर करणे.

(९) होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड इत्यादींना परवानगी देताना परवाना क्रमांक व परवान्याचा कालावधी नमूद असणे आवश्यक असल्याने, परवाना क्रमांक व कालावधी नमूद नसलेले होर्डिंग, जाहिराती इत्यादी परवाना असलातरी निष्कासित करणे.

(१०) अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड यांचेवर कारवाई करण्यापूर्वी डिजिटल फोटोग्राफ घेणे ते किमान वर्षभर जतन करून ठेवणे तसेच निष्कासन कारवाईपूर्वी पंचनामा करणे.

(११) राजकीय पुढारी/नेते यांचे वाढदिवस व सणांपूर्वी लागलेले बॅनर्स/होर्डिंग अनधिकृत असलेबाबतची खात्री करून घेऊन ते वाढदिवस व सणांच्या दिवसापूर्वीच काढून टाकण्याची कारवाई करणे.

(१२) तक्रारदारांना तक्रार क्रमांक देणे बंधनकारक असल्याने तक्रारींचा क्रमांक तक्रारदारास देणे व आलेल्या तक्रारींची खालील नमुन्यामध्ये नोंदवही जतन करणे.

| अ. क्र. | तक्रार | तक्रारदार | दिनांक | वेळ | केलेली कारवाई | कारवाईचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

(१३) तात्पुरते मंडप, कमानी इत्यादी वरील जाहिराती, बॅनर, होर्डिंग यांनाही उपरोक्त निर्देश जशेच्या तसे लागू असल्याने त्याबाबतही उक्त आदेशाप्रमाणे खात्री करून घेऊन उचित कारवाई करणे.

(१४) प्रस्तुत आदेशांनुसार केलेल्या कारवाईचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पहिल्या कार्यरत दिवशी उपायुक्त (नोडल अधिकारी) यांचेकडे सादर करणे.

(१५) जाहिराती, बॅनर, होर्डिंग इत्यादीबाबत मा. उच्च न्यायालय, मा. राज्य शासन तसेच मा. आयुक्त/उपायुक्त यांकडून यापुढे प्राप्त होणाऱ्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे.

तरी जनहित याचिकेवरील मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शहर विद्रुपीकरण करणाऱ्या विनापरवाना लावण्यात आलेले होर्डिंग्ज, फ्लेक्स, जाहिरात फलक, शुभेच्छा फलक, कमानी, स्टँण्ड बोर्ड हटविणे व जप्त करणेबाबत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अतिक्रण निर्मूलन विभागाशी समन्वय राखून संबंधितावर कारवाई करणेकामी वरील प्रभाग समिती क्रमांक ०१ ते ०४ चे सहा. आयुक्त यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून व उपायुक्त (अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम प्रतिबंध व निर्मूलन) यांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करणेत असून, यापुढे वरीलप्रमाणे सूचनांचे पालन करून पुढील कामकाज करणेचे आहे याची नोंद घ्यावी.

**सुनील पवार,**
आयुक्त तथा प्रशासक,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

सांगली, १० जानेवारी २०२४.

---

## आदेश

क्र. मनपा/टीपी/७/९/जन/१६४८/२०२३-२४.— ज्याअर्थी, सांगली मिरज-कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम विषयक तक्रारी प्राप्त होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक रहदारीच्या रस्ते अडवून बांधकाम करणे, विनापरवाना बांधकाम करणे, दिलेल्या परवानगीपेक्षा व मूळ चटई क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रात बांधकाम करणे इत्यादीबाबींचा तक्रारींमध्ये समावेश असून यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापासूनही वंचित रहावे लागत आहे. अशाप्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रणासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात, कलम २६० अन्वये मा. आयुक्त यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उक्त अधिनियमातील कलम २६१, २६४, २६७ व ४७८ आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३, ५४, ५५ व ५६ अन्वये कारवाई करण्यासाठी महापालिका नियोजन प्राधिकरणास महापालिकेतील अधिकारी नामनिर्देशित/पदनिर्देशित करता येतात.

त्याअर्थी, महानगरपालिकेचे मा. आयुक्त यांना अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारानुसार महानगरपालिकेच्या खालील तक्त्यामध्ये नमूद संबंधित अधिकाऱ्यांच्या अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणण्यासाठी तरतुदींच्या अनुषंगाने अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे प्रभाग समिती निहाय नामनिर्देशित/पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात येत आहे.

## परिशिष्ट

| अ. क्र. | अधिकारी/सेवकांचे नाव | हुद्दा | सोपविण्यात आलेले कार्यक्षेत्र (भूखंड क्षेत्रफळ) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. विनय झगडे | सहायक संचालक नगर रचना | मा. आयुक्त/उपायुक्त नेमून देतील त्या विविक्षित प्रकरणी |
| २. | श्री. सहदेव कावडे | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०१ | |
| ३. | श्री. सचिन सागावकर | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०२ | |
| ४. | श्री. मानसिंग पाटील | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०३ | |
| ५. | श्री. अनिस मुल्ला | प्रभारी सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ०४ | |
| ६. | श्री. वैभव वाघमारे | प्रभारी नगर रचनाकार प्रभाग समिती क्र. ०१ व ०२ | ५०० चौ. मी. पासून पुढील क्षेत्र |
| ७. | श्री. आर. बी. काकडे | नगर रचनाकार प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ | |
| ८. | श्री. आण्णासो मगदुम | कनिष्ठ अभियंता (मानधन), नगर रचना विभाग, प्रभाग समिती क्र. ०१. | ० ते ५०० चौ. मी. |
| ९. | श्री. यासीन मंगळवारे | कनिष्ठ अभियंता ( मानधन), नगर रचना विभाग, प्रभाग समिती क्र. ०२. | |

**परिशिष्ट--***चालू*

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १०. | श्री. शाबाज शेख | कनिष्ठ अभियंता (मानधन), नगर रचना विभाग, प्रभाग समिती क्र. ०२. | ० ते ५०० चौ. मी. |
| ११. | श्री. आजम जमादार | कनिष्ठ अभियंता (मानधन), नगर रचना विभाग, प्रभाग समिती क्र. ०३. | |
| १२. | सौ. पंकजा कोरे (रुईकर) | शाखा अभियंता प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ | |
| १३. | श्री. रवींद्र भिंगारदिवे | कनिष्ठ अभियंता (मानधन), नगर रचना विभाग, प्रभाग समिती क्र. ०४. | |

तरी, वरील नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी उपरोक्त १ ते १३ अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या कालावधीत त्यांना पदनिर्देशित अधिकारी समजण्यात येईल व उपरोक्त व्यक्तींची पदस्थापना ही बदली, निवृत्ती, मृत्यू इत्यादी कोणत्याही कारणामुळे संपुष्टात आल्यास संबंधित पदाचा पदभार स्वीकारणारा व्यक्ती हा तद्नंतर 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून जबाबदार असेल. यानुसार सदर आदेशामध्ये मा. आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका बदल करेपर्यंत उपरोक्त पदी भविष्यात कार्यरत अधिकारी अखंडपणे 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून देखील कार्यरत राहतील त्या अनुषंगाने, अशी अनधिकृत बांधकाम व त्यावर कारावयाची कार्यवाही खाली विषद केल्याप्रमाणे करणेची आहे :---

(१) आतापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अनधिकृत बांधकाम विषयक तक्रारीची पाहणी करून निश्चित कार्यवाही करणे.

(२) अनधिकृत बांधकामे थांबविण्याबरोबरच नगररचना कायद्यातील आवश्यक त्या परवानगीशिवाय केलेली बांधकामे थांबविणे.

(३) घेतलेल्या परवानगीशी सुसंगत नसलेले किंवा परवानगी घेताना घातलेल्या अटींचा भंग करून केलेले काम.

(४) मूळ चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त बांधकामे (FSI).

(५) परवानगीच्या विरोधात जाऊन केलेले काम जसे जमिनीच्या वापरात विनापरवाना बदल वगैरे उक्त बांधकामांना अनाधिकृत बांधकाम समजण्यात यावे व त्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :---

(अ) बांधकाम थांबविणे.

(ब) बांधकाम पाडणे.

(क) अशा बांधकामास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर खटला भरणे.

(ड) घर मालकाच्या निष्काळजीपणामुळे किंवा जाणीवपूर्वक केलेल्या बांधकामामुळे लगतच्या इतर इमारतीस वायुविजन, प्रकाश इत्यादी मूलभूत हक्कापासून वंचित ठेवणारी बांधकामे किंवा परिसरास हानी पोहचविण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही करणे.

(इ) कोणत्याही इमारत उभारणीचे काम अथवा बांधकाम उक्त अधिनियमांच्या किंवा उपविधीच्या तरतुदींचा भंग करत असल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून दिले असले आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी पुरेशा कारणाशिवाय कलम ५३, ५४, ५५ किंवा ५६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस कसूर करीत असेल तर त्यास दोषसिद्धीनंतर ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा २०,००० रुपये पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल अथवा दोन्ही शिक्षा करण्याची तरतूद आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(ई) वरीलप्रमाणे नियुक्त पदनिर्देशित अधिकारी/कर्मचारी यांचा साप्ताहिक अहवाल संकलित करून घेऊन मासिक अहवाल मा. आयुक्त यांचेकडे सादर करावयाचा आहे.

तरी, वरीलप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणेकामी वरील १ ते १३ अधिकारी/कर्मचारी यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत येत असून, यापुढे वरीलप्रमाणे सूचनांचे पालन करून पुढील कामकाज करणेचे आहे, याची नोंद घ्यावी.

**सुनील पवार,**
आयुक्त तथा प्रशासक,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

सांगली, १० जानेवारी २०२४.

## मुख्याधिकारी तथा प्रशासक यांजकडून

### बारामती नगरपरिषद, बारामती

*पहा* १. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम २ (६-*अ*)

२. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ (८)

### अधिसूचना

क्र. बानप/कार्या-१/पदनिर्देशित अधिकारी नियुक्ती/कार्या-२-अ/८५/२०२४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम २ (६-*अ*) नुसार पदनिर्देशित अधिकारी नियुक्ती करण्याचे प्रावधान आहे, आणि

ज्याअर्थी, 'पदनिर्देशित अधिकारी' नियुक्त करण्याचे अधिकार, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ नुसार नगरपालिकेला पर्यायाने, बारामती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना आहेत.

त्याअर्थी, मी, महेश रोकडे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, बारामती नगरपरिषद, मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार बारामती नगरपरिषदेच्या नगररचना विभागातील, सहा. नगररचनाकार श्री. ऋषीकेश साळी आणि रचना सहायक, श्री. शंतनू बारवकर यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४, ५५, ५६ चे अंमलबजावणीकरिता खालील नमूद कोष्टकातील क्षेत्रानुसार 'पदनिर्देशित अधिकारी' म्हणून नियुक्त करीत आहे.

### परिशिष्ट

| पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे कर्तव्य अधिकार | पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे नाव | पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे पदनाम | पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे निश्चित केलेले कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४, ५५ आणि ५६ मधील नमूद कार्य, कर्तव्ये व अनुषंगिक कार्ये. | १. श्री. ऋषीकेश साळी, सहा. नगर-रचनाकार, गट-ब, राजपत्रित. | सहा. नगररचनाकार, गट-ब, (राजपत्रित),बारामती नगरपरिषद, बारामती. | बारामती नगरपरिषदेचे विद्यमान कार्यक्षेत्रातील बारामती शहर व बारामती ग्रामीण क्षेत्र. |
| | २. श्री. शंतनू बारवकर, गट-ब, रचना सहायक, बारामती नगरपरिषद, बारामती. | रचना सहायक, गट-ब, बारामती नगरपरिषद, बारामती. | बारामती नगरपरिषदेच्या विद्यमान कार्यक्षेत्रातील रूई-जळोची, तांदूळवाडी क्षेत्र. |

**महेश रोकडे,**
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
बारामती नगरपरिषद, बारामती.

बारामती, ९ जानेवारी २०२४.

---

## BY CHIEF OFFICER AND ADMINISTRATOR

### Baramati Nagar Parrishad, Baramati

*See.*-- (1) Section 2 (*6-A*) of Maharashtra Regional and Town Planning Act,1966

(2) Section 53 (*8*) of Maharashtra Regional and Town Planning Act,1966

### Notification

Outward No. BNP/Desk-1/Designated Officer Appointment/कार्या-१अ/८५/2024.--- Whereas, under Section 2(*6A*) of Maharashtra Regional Town and Planning Act 1966, the provision of appointment of designated Officer is exist and ;

Whereas, the power of appointment of such designated Officer is vested in the jurisdiction of Chief Officer and Administrator of Baramati Nagarparishad, as Nagarpalika Authority.

Therefore, I, Mahesh Rokade, Chief Officer and Administrator of Baramati Nagarparishd, Baramati, appointing to Shri. Rrushikesh Sali, Assistant Town Planner, Grade-B,(Gazetted) and Shri. Shantanu Baravkar, Planning Assistant, Grade-B, of Town Planning Department of Baramati Nagarparishad, as "Designated Officer" for the implementation of Sections 54, 55 and 56 of MRTP Act, 1966, as per following table bracket.

**Schedule**

| Duty and power of Designated Officer | Name of Designated Officer | Designation of Designated Officer | Area defined to Designated Officer |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| To implement the provision of Sections 54, 55, and 56 of Maharashtra Regional Town Planning Act-1966. | 1. Shri. Rushikesh Sali, Group B, (Gazetted). | Assistnant Town Planner of Baramati Nagarparishad, Baramati. | Existing Jurisdictional Area of Baramati Gramin and Baramati Shahar of Baramati Nagarparishad. |
| | 2. Shri. Shantanu Baravkar, Group B, (Non Gazetted). | Planning Assistant of Baramati Nagar Parishad, Baramati. | Existing Jurisdictional Area of Rui, Jalochi, Tandulwadi of Baramati Nagarparishad, Baramati. |

**MAHESH ROKADE,**
Chief Officer and Administrator,
Baramati Nagarparishad, Baramati.

Baramati, 9th January 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.